# महाराष्ट्र परावैद्यक परिषद

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला,सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,
पी.डीमेलो रोड,फोर्ट,मुंबई -४०० ००१दुरध्वनी क्र.९१-२२-२२६२०३६०
ई-मेल आयडी -mpmcmumbai2017@gmail.com
वेबसाईट -www.maharashtraparamedicalcouncil.org


दि.०१.०१.२०२१

## सुचना

राज्यातील सर्व जनतेला सर्वदूर गुणवत्तापूर्ण परावैद्यकीय सेवा वाजवी दरात व योग्य वेळेत मिळावी व बोगस परावैद्यक व्यवसायी व्यक्तींवर अंकुश राहावा ह्या व्यापक जनहिताच्या उद्दिष्टाने महाराष्ट्र राज्यात ३१ जुलै २०१७ ह्या तारखेपासून मा. राष्ट्रपती, भारत सरकार ह्यांच्या मंजुरीनुसार व स्वाक्षरीसहित महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषद अधिनियम २०११ लागू झाला आहे व त्यानुसार परिषदेचे नियमित कामकाज देखील सुरू झाले आहे.

सदर अधिनियमातील परिशिष्टात नमूद केलेल्या कोणत्याही अधिकृत परावैद्यक अर्हते नुसार कोणाही व्यक्तीस परावैद्यक व्यवसायी व्यक्ती म्हणून व्यवसाय करायचा असल्यास त्या व्यक्तीला सदर परिषदेकडे कायद्यानुसार प्रस्थापित केलेल्या बाबींची पूर्तता करून अधिकृत परावैद्यक व्यवसायी व्यक्ती म्हणून नोंदणी करणे गरजेचे आहे. अशी नोंदणी असणाऱ्या अधिकृत परावैद्यक व्यवसायी व्यक्तीसच सदर कायद्याच्या अधीन राहून त्यानुसार परावैद्यक व्यवसायी व्यक्ती म्हणून व्यवसाय करण्याची मान्यता आहे.

जर नोंदणीकृत परावैद्यक व्यवसायी नसलेली कोणतीही व्यक्ती,परावैद्यक व्यवसायीची किंवा सल्लागाराची पद्दत अनुसरील किंवा जिचा वापर करील किंवा मान्यताप्राप्त परावैद्यकीय अर्हता धारण न करणारी कोणतीही व्यक्ती, अशी परावैद्यकीय अर्हता दर्शविणाऱ्या किंवा अभिप्रेत करणाऱ्या पदवीचा किंवा पदविकेचा किंवा संक्षेपाक्षराचा वापर करील अशी व्यक्ती अपराध सिध्दीनंतर अधिनियमातील कलम ३२ (क)(ख) नुसार शिक्षेस पात्र ठरेल.

या परिषदेमार्फत संबंधित व्यक्तींना आव्हान करण्यात येत आहे की ३१ मार्च २०२१ या तारखेपर्यंत परिषदेकडे आपण आपला नोंदणी अर्ज दाखल करावा. सदर तारखे नंतर कारवाई करण्यास परिषद मुक्त असेल ह्याची नोंद घ्यावी.

Delgikar

प्रबंधक
महाराष्ट्र परावैद्यक परिषद,मुंबई